## प्रकरण - III

# अर्थसंकल्पीय व्यवस्थापन

# प्रकरण III
# अर्थसंकल्पीय व्यवस्थापन

हे प्रकरण राज्य शासनाच्या वाटपाच्या प्राधान्यक्रमांचा आढावा घेते आणि अर्थसंकल्प तयार करण्यातील पारदर्शकता आणि त्याच्या अंमलबजावणीची परिणामकारकता यावर भाष्य करते. तसेच, धोरणात्मक पातळीवर घेतलेले निर्णय, प्रशासकीय स्तरावर निधीची वळवणूक न करता अंमलात आणले गेले किंवा कसे ह्याचा आढावा घेते. हे प्रकरण राज्याच्या विनियोजन लेख्यांच्या लेखापरीक्षणावर आधारित आहे.

## 3.1 अर्थसंकल्प प्रक्रिया

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 202 च्या अनुपालनानुसार प्रत्येक आर्थिक वर्षाच्या अनुषंगाने त्या वर्षासाठी राज्याच्या अंदाजित जमा व खर्चाचे विवरणपत्र राज्य विधिमंडळासमोर सादर करावयाचे असते ज्याला "वार्षिक वित्तीय विवरणपत्र" (अर्थसंकल्प) असे संबोधले जाते. खर्चाच्या अंदाजपत्रकात खर्चाच्या 'भारीत' आणि 'दत्तमत' बाबी[1] स्वतंत्रपणे दर्शविल्या जातात आणि महसुली लेख्यावरील खर्च इतर खर्चापासून वेगळा दर्शविला जातो. राज्य शासनाकडून कोणताही खर्च करण्यापूर्वी वैधानिक प्राधिकार पत्र आवश्यक आहे.

अर्थसंकल्पाशी निगडीत संज्ञांची शब्दावली **परिशिष्ट 3.1** मध्ये देण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय प्रक्रिया सामान्यत: ऑगस्टमध्ये अर्थसंकल्पीय परिपत्रक जारी करण्यापासून सुरू होते, जे विभागांना पुढील आर्थिक वर्षासाठी त्यांच्या अंदाजांची रचना करण्यासाठी मार्गदर्शन करते. राज्यातील अर्थसंकल्प तयार करण्याची प्रक्रिया **आलेख 3.1** मध्ये दिली आहे.

**आलेख 3.1: राज्यामधील अर्थसंकल्प तयारीची प्रक्रिया**




---


[1] **भारीत खर्च:** खर्चाच्या काही निश्चित बाबी (उदाहरणार्थ, सांविधानिक प्राधिकाऱ्यांचे वेतन, कर्जाचे परतावे इत्यादि) राज्याच्या एकत्रित निधीवर प्रभार आकारतात आणि हे खर्च विधिमंडळाच्या दत्तमताच्या अधीन नसतात

**दत्तमत खर्च:** इतर सर्व खर्च हे विधिमंडळाच्या दत्तमताच्या अधीन असतात.

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका (प्रकरण IX) नुसार वित्त विभाग सर्व मंत्रालयांकडून अंदाजपत्रके प्राप्त करून वार्षिक अर्थसंकल्प तयार करण्यासाठी जबाबदार आहे. विभाग प्रमुखांच्या सल्ल्यानुसार नियंत्रण अधिकारी विभागीय जमा आणि खर्चाची विभागीय अंदाजपत्रके तयार करतात आणि विहित मुदतीनुसार वित्त विभागाला सादर करतात. वित्त विभाग अंदाजपत्रकांची छाननी करतो आणि सविस्तर अंदाजपत्रके तयार करतो ज्याला, 'अनुदानाकरिता मागणी' असे संबोधतात. अर्थसंकल्प तयार करताना अंदाज शक्य तितके प्रत्यक्ष आकडेवारीशी जुळणारे असावेत हे उद्दिष्ट असावे. अर्थसंकल्पीय प्रक्रियेमध्ये विनिर्दिष्ट आहे की विशिष्ट बाबींवरील खर्चासाठी अंदाजपत्रकात तरतूद केलेली रक्कम ही वर्षभरात खर्च करता येण्याएवढी असावी आणि ती जास्त किंवा कमी सुद्धा नसावी. ज्याप्रमाणे अंदाजपत्रकातील आधिक्य वित्तीय अनियमितता दर्शविते त्याचप्रमाणे अंदाजपत्रकातील बचत देखील तेवढीच वित्तीय अनियमितता प्रस्थापित करते. जमेची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके ही कर, शुल्क, फी इत्यादींच्या विद्यमान दरांवर आधारित असावी.

वर्ष 2022-23 मधील मूळ व पुरवणी अर्थसंकल्प, खर्च व बचत यासह राज्य विधिमंडळाने मंजूर केलेली एकूण रक्कम **आलेख 3.2** मध्ये चित्रित केले आहे.

**आलेख 3.2: अर्थसंकल्प अंमलबजावणीचा ओघ तक्ता**




स्त्रोत: विनियोजन लेखे 2022-23

## 3.1.1 वित्तीय वर्षातील एकूण तरतूद, प्रत्यक्ष संवितरणे आणि बचतीचा सारांश

300 अनुदाने/विनियोजने यांमध्ये 2022-23 मधील एकूण अर्थसंकल्पीय तरतुदी, प्रत्यक्ष खर्च आणि बचतीची संक्षिप्त स्थिती **तक्ता 3.1** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 3.1: 2022-23 दरम्यान अर्थसंकल्पीय तरतूद, संवितरणे आणि बचत**

(₹ कोटीत)

| एकूण अर्थसंकल्पीय तरतूद | | संवितरणे | | बचत | |
|---|---|---|---|---|---|
| दत्तमत | भारीत | दत्तमत | भारीत | दत्तमत | भारीत |
| 547921.89 | 104887.25 | 444090.50 | 89983.70 | 103831.39 (18.95) | 14903.55 (14.21) |

स्त्रोत: विनियोजन लेखे 2022-23
कंसातील आकडेवारी ही एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीतील बचतीची टक्केवारी आहे

## 3.1.2 भारीत आणि दत्तमत संवितरणे

संविधानाच्या अनुच्छेद 112 (2) नुसार वार्षिक वित्तीय विवरणपत्रात समाविष्ट केलेल्या खर्चाच्या अंदाजपत्रकात विधिमंडळाने मान्य केलेल्या खर्चाची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असलेली रक्कम राज्याच्या एकत्रित निधीवर भारीत

खर्च आणि राज्याच्या एकत्रित निधीतून प्रस्तावित इतर खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेली इतर सर्व रक्कम स्वतंत्रपणे दर्शविली जाईल आणि महसुली लेख्यावरील खर्च इतर खर्चांपेक्षा वेगळा दर्शविला जाईल.

मागील पाच वर्षातील (2018-19 ते 2022-23) एकूण भारीत आणि दत्तमत संवितरण आणि बचतीचे कल विश्लेषण **तक्ता 3.2** मध्ये दर्शविले आहेत.

**तक्ता 3.2: 2018-19 ते 2022-23 दरम्यान संवितरण आणि बचत**

(₹ कोटीत)

| वर्ष | संवितरण | | बचत | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दत्तमत | भारीत | दत्तमत | *टक्केवारी* | भारीत | *टक्केवारी* |
| 2018-19 | 278697.33 | 64237.70 | 69773.31 | 25.03 | 4083.05 | 6.35 |
| 2019-20 | 328039.77 | 63443.42 | 101966.86 | 31.08 | 3726.33 | 5.87 |
| 2020-21 | 320694.58 | 96353.79 | 104429.48 | 32.56 | 2811.71 | 2.91 |
| 2021-22 | 370445.46 | 82405.21 | 93242.70 | 25.17 | 18293.33 | 22.20 |
| 2022-23 | 444090.50 | 89983.70 | 103831.39 | 18.95 | 14903.55 | 14.21 |
| स्त्रोत : संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे | | | | | | |

दत्तमत अनुदानाअंतर्गत संवितरणाच्या टक्केवारीत बचत ही 2018-19 मधील 25.03 *टक्क्यां*वरून 2022-23 मध्ये 18.95 *टक्के* इतक्या लक्षणीय प्रमाणात कमी झाली.

## 3.1.3 अर्थसंकल्पीय कुशलता (मार्कमनशीप)

### 3.1.3.1 एकूण अर्थसंकल्पीय निष्पत्ती (आऊटटर्न)

एकूण अर्थसंकल्पीय निष्पत्ती हे एकूण अर्थसंकल्पीय खर्चाचे प्रमाण/प्रत्यक्ष खर्च हे मंजूर रकमेपेक्षा कमी आणि मंजूर रकमेपेक्षा जास्त प्रमाणात मूळ मंजूर रक्कम प्रतिबिंबित करते.

**तक्ता 3.3: मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत प्रत्यक्ष निष्पत्ती**

(₹ कोटीत)

| तपशील | मूळ मंजूर अर्थसंकल्प | प्रत्यक्ष निष्पत्ती | प्रत्यक्ष आणि मूळ* मधील फरक |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| महसुली | 436214.15 | 415536.35 | (-)20677.80 |
| भांडवली | 132056.48 | 118537.85 | (-)13518.63 |
| एकूण | 568270.63 | 534074.2 | (-)34196.43 |
| *तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष अधिक आकडा (+) म्हणून दर्शविला आहे आणि मूळ तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष कमी आकडा (-) म्हणून दर्शविला आहे<br>स्त्रोतः विनियोजन लेखे 2022-23 | | | |

महसुली विभागात मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत निष्पत्तीमधील विचलन (डेव्हीएशन) 4.74 *टक्के* होते. हे 101 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के* दरम्यान, 42 अनुदानांमध्ये ±25 ते ±50 *टक्के* दरम्यान, 21 अनुदानांमध्ये ±50 ते 100 *टक्के* दरम्यान आणि 13 अनुदानांमध्ये 100 *टक्क्यांच्या* बरोबरीने किंवा त्यापेक्षा अधिक विचलन झाल्याने होते. तथापि, महसुली विभागातील तीन अनुदानांबाबत कोणतीही मूळ तरतूद करण्यात आली नव्हती.

भांडवली विभागात मूळ अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत निष्पत्तीमधील विचलन 10.24 *टक्के* होते. हे 75 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के* दरम्यान, 17 अनुदानांमध्ये ±25 ते ±50 *टक्के* दरम्यान, 12 अनुदानांमध्ये ±50 *टक्के* ते 100 *टक्के* दरम्यान आणि 14 अनुदानांमध्ये 100 *टक्क्यां*इतके किंवा त्याहून अधिक विचलन झाल्याने होते. तथापि, भांडवली विभागातील दोन अनुदानांबाबत कोणतीही मूळ तरतूद करण्यात आली नव्हती.

#### 3.1.3.2 खर्चाच्या घटकांची निष्पत्ती

खर्चाच्या घटकांची निष्पत्ती ही अंमलबजावणी दरम्यान मुख्य अर्थसंकल्पीय बाबींमधील पुनर्वाटपामुळे खर्चाच्या रचनेत किती फरक पडला आहे हे मोजते.

**तक्ता 3.4: अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष खर्चाच्या तुलनेत सुधारित अंदाज**

(₹ कोटीत)

| तपशील | मूळ मंजूर अर्थसंकल्प | सुधारित अंदाज | प्रत्यक्ष निष्पत्ती | मूळ मंजूर अर्थसंकल्प आणि सुधारित अंदाज यामधील फरक | प्रत्यक्ष आणि सुधारित* यामधील फरक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| महसुली | 436214.15 | 498740.59 | 415535.64 | 62526.44 | (-)83204.95 |
| भांडवली | 132056.48 | 154068.56 | 118537.85 | 22012.08 | (-)35530.71 |
| **एकूण** | **568270.63** | **652809.15** | **534073.49** | **84538.52** | **(-)118735.66** |

*सुधारित अंदाजापेक्षा प्रत्यक्ष अधिक (+) आकडा म्हणून दर्शविला जातो आणि मूळ तरतुदीपेक्षा प्रत्यक्ष कमी आकडा (-) म्हणून दर्शविला जातो
स्त्रोत: विनियोजन लेखे 2022-23

महसुली विभागात सुधारित अंदाजपत्रकाच्या तुलनेत निष्पत्तीमध्ये 16.68 *टक्के* विचलन होते. हे 107 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के*, 43 अनुदानांमध्ये ±25 ते ±50 *टक्के*, 18 अनुदानांमध्ये ±50 टक्के ते 100 *टक्के* आणि 12 अनुदानांमध्ये 100 *टक्क्यां*इतके किंवा त्याहून अधिक विचलन झाल्याने होते.

भांडवली विभागात सुधारित अंदाजपत्रकाच्या तुलनेत निष्पत्तीमध्ये 23.06 *टक्के* विचलन होते. 80 अनुदानांमध्ये 0 ते ±25 *टक्के*, 17 अनुदानांमध्ये ±25 ते ±50 *टक्के*, 14 अनुदानांमध्ये ±50 *टक्के* ते 100 *टक्के* आणि नऊ अनुदानांमध्ये 100 *टक्क्यांच्या* बरोबरीने किंवा त्याहून अधिक विचलन झाल्याने होते.

## 3.2 विनियोजन लेखे

विनियोजन लेखे राज्य शासनाच्या प्रत्येक वर्षासाठीच्या खर्चाची तुलना भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 204 आणि 205 अन्वये पारित केलेल्या विनियोजन अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले विविध उद्देशांसाठीची दत्तमत अनुदाने व भारीत विनियोजन यांच्या रकमेशी करते. विनियोजन लेखे स्थूल आधारावर असतात. हे लेखे मूळ अर्थसंकल्पीय तरतूद, पुरवणी अनुदाने, प्रत्यार्पण आणि पुनर्विनियोजन स्पष्टपणे दर्शवितात आणि अर्थसंकल्पातील भारीत आणि दत्तमत दोन्ही बाबींच्या संदर्भात विनियोजन अधिनियमांतर्गत प्राधिकृत केलेल्या सेवांच्या तुलनेत विविध विशिष्ट सेवांवरील प्रत्यक्ष भांडवली आणि महसुली खर्च दर्शवितात. अशाप्रकारे, विनियोजन लेखे निधीची उपयोगिता, वित्त व्यवस्थापन आणि अर्थसंकल्पीय तरतुदींच्या संनियंत्रणाला सुकर करतात आणि म्हणूनच वित्त लेख्यांना पूरक असतात.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक विनियोजनाची लेखापरीक्षा करताना खात्री करतात की, प्रत्यक्षात विविध अनुदानांतर्गत झालेला खर्च हा त्या वर्षासाठी विनियोजन अधिनियमानुसार प्राधिकृत केलेल्या खर्चाच्या अनुषंगाने आहे आणि संविधानाच्या (अनुच्छेद 202) प्रावधानांतर्गत आकारण्यात येणारा खर्च इतका आकारला गेला आहे किंवा कसे. तसेच, झालेला खर्च हा कायदे, संबंधित नियम, विनियमन आणि निर्देश यांच्याशी सुसंगत आहे की नाही हे देखील तपासले जाते.

## 3.3 अर्थसंकल्पीय आणि लेखा प्रक्रियेच्या सचोटीवर टिप्पण्या

### 3.3.1 अनावश्यक किंवा अतिरिक्त पुरवणी अनुदाने

भारतीय संविधानाचे अनुच्छेद 205 सह महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका परिच्छेद 169 आणि 170 हे पुरवणी अर्थसंकल्प किंवा पुरवणी अंदाजपत्रकाला कायदेशीर आधार प्रदान करतात. 2022-23 मध्ये पुरवणी तरतुदी (₹ 84,538.52 कोटी) ह्या मूळ तरतुदींच्या 14.88 *टक्के* (₹ 5,68,270.62 कोटी) होत्या.

वर्षभरात 38 दत्तमत अनुदानांमध्ये (प्रत्येक प्रकरणात ₹10 कोटी किंवा त्याहून अधिक) एकूण ₹ 26,214.03 कोटींच्या प्राप्त झालेल्या पुरवणी तरतुदी अनावश्यक ठरल्या कारण ₹ 1,97,603.19 कोटींचा प्रत्यक्ष खर्च हा मूळ तरतुदीच्या (₹ 2,41,614.91 कोटी) स्तरापर्यंत पोहोचला नाही जे **परिशिष्ट 3.2** मध्ये तपशीलवार दिले आहे. ₹ 1,000 कोटींपेक्षा अधिक बचत असलेली आणि पुरवणी तरतूद अनावश्यक ठरलेली अनुदाने **तक्ता 3.5** मध्ये दर्शविली आहेत.

**तक्ता 3.5 : ₹ 1,000 कोटींपेक्षा अधिक बचत झालेली अनुदाने जेथे पुरवणी तरतूद अनावश्यक ठरली**

(₹ कोटीत)

| अनुदान क्रमांक आणि तपशील | मूळ तरतूद | पुरवणी तरतूद | खर्च | मूळ तरतुदींमधून बचत (टक्केवारी) |
|---|---|---|---|---|
| **महसुली विभाग दत्तमत** | | | | |
| बी.1-पोलीस प्रशासन | 24583.07 | 134.20 | 19978.85 | (-)4604.22 |
| एफ.2-नगर विकास व इतर प्रगत सेवा | 15692.66 | 2146.35 | 12003.34 | (-)3689.32 |
| जी.6- निवृत्तीवेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ | 45448.34 | 2001.85 | 43017.19 | (-)2431.16 |
| एन.3- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण | 14779.37 | 3133.61 | 13010.53 | (-)1768.84 |
| ओ.3-ग्रामीण रोजगार | 3634.03 | 150.00 | 1863.57 | (-)1770.46 |
| टी.5- जनजाती क्षेत्र विकास उप-योजनेवरील महसुली खर्च | 11485.24 | 1836.17 | 9542.71 | (-)1942.53 |
| वाय.2- पाणीपुरवठा व स्वच्छता | 10861.85 | 716.16 | 3911.68 | (-)6950.17 |
| **भांडवली विभाग** | | | | |
| एच.8- सार्वजनिक बांधकामे, प्रशासकीय व कार्यचालन इमारतींवरील भांडवली खर्च | 3686.38 | 695.91 | 1855.24 | (-)1831.14 |
| आय. 5- पाटबंधाऱ्यांवरील भांडवली खर्च | 15037.04 | 1504.52 | 11551.26 | (-)3485.78 |
| एल.7- ग्रामविकासावरील भांडवली खर्च | 5404.98 | 241.17 | 4119.83 | (-)1285.15 |
| ओ.10-इतर ग्रामविकासावरील कार्यक्रमांवर भांडवली खर्च | 5646.73 | 267.42 | 1705.45 | (-)3941.28 |
| स्त्रोत : विनियोजन लेखे 2022-23 | | | | |

वरील बाबी दर्शवितात की मूळ अनुदानाच्या तुलनेत बचत असूनही पुरवणी अनुदानाच्या तरतुदीमुळे निधीचा वापर करू शकणाऱ्या इतर विभागांना वंचित रहावे लागले. विभागाने निधीच्या गरजेचा अंदाज मजबूत करणे आणि पुरवणी तरतुदींच्या आधारांचा/कारणांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

## 3.3.2 आकस्मिकता निधीमधून अग्रिमे

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 267(2) व 283(2) मधील तरतुदींनुसार महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम 1956 अंतर्गत राज्याचा आकस्मिकता निधी निर्माण करण्यात आला आहे. अकल्पित आणि तातडीच्या स्वरुपातील खर्च जे विधिमंडळाची मान्यता प्राप्त होईपर्यंत स्थगित ठेवणे इष्ट नसते, फक्त ते खर्च भागविण्यासाठीच आकस्मिकता निधीमधून अग्रिमे दिली जातात. हा निधी अग्रधन स्वरूपात असतो.

महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमानुसार राज्याचा आकस्मिकता निधी निकाय (कॉर्पस) ₹ 150 कोटी आहे. 01 नोव्हेंबर 2022 च्या अध्यादेशानुसार तो ₹ 200 कोटींनी वाढविण्यात आला. वर्ष 2022-23 मध्ये राज्य शासनाने आकस्मिकता निधीतून ₹ 311.00 कोटी आहरीत केले आणि 31 मार्च 2023 पर्यंत संपूर्ण रक्कम परत करण्यात आली.

2022-23 दरम्यान वित्त विभागाने जारी केलेल्या ₹ 311.00 कोटींच्या दोन मंजुरींपैकी ₹ 311.00 कोटींचे दोन आहरण या निधीमधून करण्यात आले. 2022-23 दरम्यान आकस्मिकता निधीतून आहरणाचा तपशील **तक्ता 3.6** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 3.6: आकस्मिकता निधी मंजुरी आदेश आणि मंजुरीच्या तुलनेत उपयोगिता**

(₹ कोटीत)

| अनु क्र. | मंजुरी संख्या आणि दिनांक | मुख्य शीर्ष/ अनुदान क्र. | आहरणाचे प्रयोजन | मंजुरी | खर्च | पुनर्भरण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सीएनएफ-2022/सी.आर.01/ अर्थसंकल्प-18/27/09/2023 | 5475/जी-08 | भागभांडवल व अनुषंगिक खर्चासाठी महा आर्क लि. | 111.00 | 111.00 | 111.00 |
| 2 | सीएनएफ-2022/सी.आर.01/ अर्थसंकल्प-18/02/11/2022 | 5475/जी-08 | भागभांडवल व अनुषंगिक खर्चासाठी महा आर्क लि. | 200.00 | 200.00 | 200.00 |
| **एकूण** | | | | **311.00** | **311.00** | **311.00** |

स्त्रोतः संबंधित विभागाचे आकस्मिकता निधी मंजुरी आदेश आणि महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता) -I, महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेली माहिती

### 3.3.3 निधीचे अतिरिक्त/अनावश्यक पुनर्विनियोजन

पुनर्विनियोजन म्हणजे बचतीची अपेक्षा असलेल्या एका विनियोजनाच्या अनुदानातील एका घटकामधील निधी दुसरा घटक जेथे अधिक निधीची आवश्यकता निश्चित केली जाते तेथे हस्तांतरित करणे. महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकेच्या परिच्छेद 162 ते 164 नुसार, वित्त विभाग आणि सचिवालयाचा प्रशासकीय विभाग, विनियोजन अधीनियमांतील त्याच अनुदान/विनियोजनांतर्गत मुख्य शीर्ष, गौण शीर्ष अथवा उपशीर्षामधून इतर समान शीर्षामध्ये पुनर्विनियोजन मंजूर करू शकतात.

अनेक प्रकरणांमध्ये पुनर्विनियोजन अतिरिक्त ठरल्यामुळे मोठ्या प्रमाणात बचत झाली. **परिशिष्ट 3.3** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 48 प्रकरणांमध्ये पुनर्विनियोजन अनावश्यक ठरले, कारण पुनर्विनियोजित रकमेमुळे शेवटी प्रत्येक प्रकरणात ₹ 10 कोटी किंवा त्यापेक्षा अधिक बचत झाली. वरील उदाहरणे ह्या वस्तुस्थितीचे निदर्शक आहेत की, आवश्यकतांचे पर्याप्त निर्धारण अर्थसंकल्पीय नियंत्रक अधिकारी करू शकले नाही आणि पुनर्विनियोजनापूर्वी खर्चासंदर्भातील माहिती अद्ययावत केली नाही.

### 3.3.4 अखर्चित रक्कम आणि प्रत्यार्पित विनियोजन आणि/अथवा मोठ्या प्रमाणात बचत/प्रत्यार्पण


सुमार खर्च संनियंत्रण कार्यतंत्र आणि कमकुवत योजना अंमलबजावणी क्षमता/कमकुवत अंतर्गत नियंत्रणे यावर आधारित अर्थसंकल्पीय तरतूद, आर्थिक वर्षाच्या अखेरीस निधी मुक्त करण्यास प्रोत्साहन देणे आणि मोठ्या प्रमाणात निधी शासकीय लेख्यांच्या बाहेर बँकांमध्ये राखून ठेवण्याच्या विभागाच्या प्रवृत्तीला उद्धृत करतात. अतिरिक्त बचतीमुळे इतर विभागदेखील वापरता येणाऱ्या निधीपासून वंचित राहतात.

विनियोजन लेख्यांच्या लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की 2022-23 मध्ये ₹1,18,734.94 कोटींच्या निव्वळ बचतीपैकी ₹81,572.29 कोटींची (एकूण बचतीच्या 68.70 *टक्के*) 71 अनुदानांमधील बचत प्रत्येक प्रकरणातील एकूण तरतुदीच्या 20 *टक्के* किंवा त्याहून अधिक होती जे **परिशिष्ट 3.4** मध्ये दर्शविले आहे. तसेच, 71 अनुदानांमध्ये प्रत्येक प्रकरणात ₹ 100 कोटींपेक्षा जास्त बचत झाली होती जे **परिशिष्ट 3.5** मध्ये दर्शविले आहे.

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकेच्या परिच्छेद 173 मध्ये असे नमूद केले आहे की इतर शीर्षाखाली संभाव्य अकल्पित अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी किंवा नवीन खर्च ज्याची सामान्यतः पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद केली जाऊ शकते त्याची पूर्तता करण्यासाठी वितरण किंवा नियंत्रण अधिकाऱ्यांनी बचत राखीव ठेवू नये. सर्व बचती जेव्हा लक्षात येतात तेव्हा त्या तात्काळ प्रत्यार्पित कराव्यात. ज्या तरतुदींचा फायदेशीररित्या उपयोग करता येणार नाहीत त्या प्रत्यार्पित कराव्यात.

2022-23 दरम्यान 276 दत्तमत अनुदानातील एकूण बचतीसह एकूण तरतुदीच्या वापराची टक्केवारी **आलेख 3.3** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 3.3: अनुदानानुसार उपयोगिता आणि बचती**




(स्त्रोत: विनियोजन लेखे 2022-23)

276 दत्तमत अनुदानांपैकी सहा अनुदानांमध्ये अतिरिक्त खर्च झाला, केवळ 124 अनुदाने त्यांच्या एकूण अर्थसंकल्पीय तरतुदीच्या 90 ते 100 *टक्के* वापर करू शकले, ज्यामुळे ₹ 11,936.44 कोटींची बचत झाली, तर 22 अनुदाने केवळ 10 *टक्केच* अर्थसंकल्पीय तरतुदी वापरू शकल्या.

मोठ्या बचतीसाठी विभागांनी दिलेली कारणे जी विनियोजन लेख्यांमध्ये नमूद करण्यात आली आहेत ती पुढील परिच्छेदात दिली आहेत.

**अनुदान एफ-2- नगरविकास व इतर प्रगत सेवा-** मुख्य शीर्ष 2217- नगरविकास गौण शीर्ष 191-स्थानिक संस्था, महानगरपालिका इत्यादींना सहाय्य अंतर्गत स्मार्ट सिटी अभियानाची ₹ 1,116 कोटी (केंद्र हिस्सा) व ₹ 558.00 कोटी (राज्य हिस्सा) अर्थसंकल्पीय तरतूद मार्च 2023 मध्ये कोणतेही विशिष्ट कारण न देता पुनर्विनियोजन/प्रत्यार्पणाद्वारे काढून घेण्यात आली.

**अनुदान एल-3- ग्रामविकास कार्यक्रम -** मुख्य शीर्ष 2235-सामाजिक सुरक्षा व कल्याण, गौण शीर्ष 103-महिला कल्याण अंतर्गत अस्मिता कार्यक्रम (राज्य योजना) अंतर्गत ग्रामीण भागातील शाळकरी मुलींना सवलतीच्या दरात सॅनिटरी नॅपकिन्स उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसहाय्य याकरिता पुरवणी मागणीद्वारे ₹ 262.39 कोटींची रक्कम प्राप्त झाली. तथापि, शासनस्तरावर अस्मिता योजनेच्या अंमलबजावणीचा सुधारित आराखडा अंतिम न झाल्याने मार्च 2023 मध्ये ₹ 262.39 कोटींची संपूर्ण रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली. तसेच, असे निदर्शनास आले की, 2018-19 दरम्यान पुरवणी मागणीद्वारे प्राप्त झालेले अंदाजपत्रकातील 55 *टक्के* रक्कम पात्र लाभार्थ्यांच्या संख्येच्या आधारे मार्च 2019 मध्ये प्रत्यार्पित करण्यात आली होती. 2019-20 ते 2021-22 या कालावधीतील संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद ही त्या आर्थिक वर्षातील मार्चमध्ये प्रत्यार्पित करण्यात आली. या योजनेला मंत्रिमंडळाने मान्यता दिली नाही आणि अस्मिता कार्यक्रमांतर्गत उपलब्ध असलेल्या मागील वर्षाच्या निधीतून केलेला खर्च ही प्रत्यार्पणाची कारणे संबंधित वर्षाच्या विनियोजन लेख्यांमध्ये देण्यात आली.

**अनुदान एल-7 ग्रामविकासावरील भांडवली खर्च -** मुख्य शीर्ष 4515- इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च, गौण शीर्ष 103-ग्रामविकास अंतर्गत पुरवणी मागणीद्वारे ₹ 228.40 कोटींची रक्कम प्राप्त झाली. तथापि, एकल नोडल अभिकरण लेख्यांना उपशीर्ष जोडण्यात (मॅपिंग) तांत्रिक अडचण आल्याने ₹ 228.40 कोटींची संपूर्ण तरतूद प्रत्यार्पणाद्वारे काढून घेण्यात आली.

**अनुदान वाय-2 पाणीपुरवठा व स्वच्छता-** मुख्य शीर्ष 2215-पाणीपुरवठा व स्वच्छता-गौण शीर्ष 196-जिल्हा परिषद/जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य अंतर्गत एकात्मिक ग्रीड प्रक्रियेद्वारे मराठवाडा विभागासाठी पाणीपुरवठा योजनेसाठी ₹ 200 कोटींचे सहाय्यक अनुदान देण्यात आले. या योजनेअंतर्गत अंमलबजावणी करणाऱ्या अभिकरणांकडून कोणतीही मागणी न झाल्याने ₹ 200 कोटींची संपूर्ण रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली.

### 3.3.4.1 बचतीमधील सातत्य

बचतीमधील सातत्य म्हणजे दर वर्षी वाटप केलेल्या निधीचा पूर्ण वापर न करण्याची सातत्यपूर्ण प्रथा. मागील पाच वर्षात बचतीमधील सातत्यावरून असे निदर्शनास आले की विभागांमधील अर्थसंकल्पीय नियंत्रणे प्रभावी नव्हती आणि वर्षाकरिता निधी वाटप करताना मागील वर्षांचे कल विचारात घेतले नव्हते. अनुदानाची चाचणी-तपासणी केली असता, लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की 39 प्रकरणांमध्ये **(परिशिष्ट 3.6)** गेल्या पाच वर्षांपासून सातत्याने ₹ 100 कोटींहून अधिक बचत झाली.

2018-19 ते 2022-23 या प्रत्येक आर्थिक वर्षात अनुदान क्यू-03 'गृहनिर्माण' अंतर्गत एकूण तरतुदीच्या 51 *टक्के* ते 98 *टक्के* दरम्यान आणि अनुदान ओ-10 'इतर ग्रामविकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च' अंतर्गत 71 *टक्के* ते 89 *टक्के* दरम्यान बचत झाली.

### 3.3.4.2 'निरंक' खर्चासह अनुदान

2022-23 या आर्थिक वर्षात तीन अनुदानांतर्गत करण्यात आलेल्या ₹ 10 कोटींपेक्षा अधिक ₹ 69.51 कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद वर्षअखेरीस अखर्चित राहिली. **तक्ता 3.7** मध्ये तपशील दिले आहेत.

**तक्ता 3.7: 'निरंक' खर्चासह अनुदान**

(₹ कोटीत)

| अक्र | अनुदान | दत्तमत/ भारीत | एकूण तरतूद | प्रत्यक्ष खर्च | टिप्पणी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | डी-01 व्याज प्रदाने | दत्तमत | 17.51 | 0.00 | नाबार्डकडून कर्ज प्राप्त न झाल्यामुळे संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली. |
| 2. | डी-10 राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण | भारीत | 15.00 | 0.00 | राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाकडून कर्जाची तरतूद करण्यात आली; कोणतेही विशिष्ट कारण न देता संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली. |
| 3. | एक्स-03 सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च | दत्तमत | 37.00 | 0.00 | 13व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार आंगणवाडी केंद्रे बांधण्याची तरतूद करण्यात आली होती. या योजनेतील कामांचा आढावा घेण्याचे वित्त विभागाचे निर्देश लक्षात घेऊन संपूर्ण रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली. |
| **एकूण** | | | **69.51** | | |
| स्त्रोत: विनियोजन लेखे 2022-23 | | | | | |

### 3.3.5 अतिरिक्त खर्च व त्याचे नियमितीकरण

संविधानाच्या अनुच्छेद 205 (1)(ब) मध्ये अशी तरतूद आहे की, आर्थिक वर्षादरम्यान कोणत्याही सेवेवर त्या सेवेसाठी, त्या वर्षी मंजूर केलेल्या रकमेपेक्षा अधिक खर्च झाला असेल तर, राज्यपालांनी अशा अतिरिक्तची मागणी विधिमंडळात सादर करावयास हवी. यावरून हे ध्वनित होते की आर्थिक वर्षाकरिता अनुदान/विनियोजनापेक्षा अतिरिक्त खर्च राज्य विधिमंडळाद्वारे नियमित करणे राज्य शासनाला अनिवार्य आहे. अधिक खर्चाच्या नियमितीकरणाबाबत जरी कालमर्यादा निर्धारित केली नसली तरी, अतिरिक्त खर्चाचे नियमितीकरण हे लोकलेखा समितीमध्ये विनियोजन लेख्यांवर चर्चा पूर्ण झाल्यावर केले जाते. असे करण्यात अपयश आल्यास संविधानाच्या तरतुदींचे उल्लंघन आहे आणि जनतेच्या पैशाच्या वापराबद्दल विधिमंडळाच्या कार्यकारिणीचे उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट विफल होते.

### 3.3.5.1 2022-23 वर्षाशी संबंधित अतिरिक्त खर्च

वर्षभराच्या तरतुदीपेक्षा अधिक खर्च हा केवळ विधिमंडळाच्या मंजुरीसाठी आवश्यक असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करत नाही तर तो चुकीच्या नियोजनाचेही निर्देशक आहे, जो खर्चाच्या प्रगतीचा माग त्या प्रयोजनाकरिता केलेल्या अर्थसंकल्पासोबत घेऊन टाळता येऊ शकतो. तथापि, 2022-23 या वर्षात ₹ 6,52,809.14 कोटींच्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत 300 अनुदान/विनियोजनांमध्ये ₹ 5,34,074.20 कोटी खर्च करण्यात आले. एकूण ₹ 1,18,734.94 कोटींची बचत झाली असली तरी सहा दत्तमत अनुदाने आणि दोन भारीत विनियोजनांमध्ये ₹ 71.66 कोटींचा अतिरिक्त खर्च झाला, ज्याचे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 नुसार नियमितीकरण आवश्यक होते.

2022-23 मध्ये तरतुदींपेक्षा अतिरिक्त खर्चासह बंद झालेली अनुदाने/विनियोजने ज्यांना नियमितीकरणाची आवश्यकता आहे ती **तक्ता 3.8** मध्ये दर्शविली आहेत.

**तक्ता 3.8: 2022-23 मध्ये ज्या अनुदाने/विनियोजनांमध्ये तरतूदीपेक्षा अधिक खर्च झाला व जो नियमित करणे आवश्यक होते**

**(₹ कोटीत)**

| अक्र | दत्तमत/भारीत विनियोजनाचे नाव | एकूण अनुदान | खर्च | अधिक |
|---|---|---|---|---|
| | **दत्तमत अनुदान** | | | |
| 1 | ओ-24 जिल्हा योजना - सिंधुदुर्ग | 144.60 | 144.66 | 0.05 |
| 2 | ओ-30 जिल्हा योजना-सांगली | 278.44 | 278.45 | 0.01 |
| 3 | ओ-43 जिल्हा योजना-अहमदनगर | 117.83 | 118.41 | 0.58 |
| 4 | ओ-70 जिल्हा योजना-गडचिरोली | 231.35 | 231.51 | 0.16 |
| 5 | ओ-74 जिल्हा योजना- अमरावती | 257.74 | 257.84 | 0.10 |
| 6 | डब्ल्यू -04 कला आणि संस्कृती | 432.89 | 481.08 | 48.19 |
| | **भारीत विनियोजन** | | | |
| 7 | जी-06 निवृत्तीवेतन आणि इतर निवृत्ती लाभ | 76.24 | 92.79 | 16.55 |
| 8 | टी-01 व्याज प्रदाने | 53.53 | 59.56 | 6.02 |
| **एकूण** | | **1592.62** | **1664.30** | **71.66** |
| स्त्रोत: विनियोजन लेखे 2022-23 | | | | |

### 3.3.5.2 मागील आर्थिक वर्षांमधील अतिरिक्त खर्च नियमित करणे

वरील परिच्छेद 3.3.5 मध्ये नमूद केल्याप्रमाणे, अतिरिक्त खर्च वाढीव कालावधीसाठी अनियमित राहिल्यास कार्यकाऱ्यांवरील कायदेविषयक नियंत्रण सौम्य होते. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 नुसार अनुदान/विनियोजनापेक्षा अधिक खर्च राज्य विधीमंडळाकडून नियमित करून घेणे राज्य शासनाला अनिवार्य आहे. खर्च नियमित करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नसली तरी लोक लेखा समितीकडून विनियोजन लेख्यांवरील चर्चा पूर्ण झाल्यानंतर अधिक खर्चाचे नियमितीकरण केले जाते. 42 अनुदाने व 15 विनियोजनांसंदर्भात वर्ष 2017-18, 2018-19, 2019-20, 2020-21 आणि 2021-22 या वर्षांसाठी ₹ 2,918.52 कोटींचा अधिक खर्च मार्च 2023 पर्यंत नियमितीकरणासाठी प्रलंबित होता जे **परिशिष्ट 3.7** मध्ये तपशीलवार दिले आहे.

### 3.3.6 भांडवली मालमत्तेच्या निर्मितीसाठी सहाय्यक अनुदाने

सहाय्यक अनुदाने म्हणजे एका सरकारने दुसऱ्या सरकार, संस्था किंवा व्यक्तीला केलेल्या सहाय्याच्या किंवा अंशदानाच्या स्वरूपातील प्रदाने होय.

भारत सरकार लेखांकन मानक-2 नुसार अनुदानकर्त्याने अनुदानग्राहीला संवितरित केलेले सहाय्यक अनुदान महसुली खर्च म्हणून वर्गीकृत आणि लेखांकित करावयास हवे.

2018-19 ते 2022-23 साठी भांडवली खर्च म्हणून सहाय्यक अनुदानाचे चुकीचे वर्गीकरण **तक्ता 3.9** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 3.9: सहायक अनुदानाचे भांडवली खर्च म्हणून झालेले चुकीचे वर्गीकरण**

(₹ कोटीत)

| | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | 2022-23 |
|---|---|---|---|---|---|
| सहाय्यक अनुदान भांडवली खर्च म्हणून नोंद केले | 1311.26 | 1580.59 | 1423.66 | 1662.63 | 3440.70 |
| एकूण खर्च | 303615.89 | 338690.64 | 342638.31 | 398792.31 | 473922.42 |
| भांडवली खर्च | 35049.05 | 36415.57 | 29686.70 | 46670.39 | 61643.61 |
| भांडवली खर्चामध्ये सहाय्यक अनुदानाचा *टक्क्यां*मध्ये हिस्सा | 3.74 | 4.34 | 4.80 | 3.56 | 5.58 |
| जर सहाय्यक अनुदानामधून होणारा खर्च महसुली खर्च मानला गेल्यास महसुली तूट (-)/महसुली अतिरिक्त (+) वरील परिणाम | 1311.26 | 1580.59 | 1423.66 | 1662.63 | 3440.70 |

स्त्रोत : संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

## 3.4 अर्थसंकल्पीय आणि लेखा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर टिप्पण्या

### 3.4.1 एकरकमी अर्थसंकल्पीय तरतुदी

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, परिशिष्ट X च्या परिच्छेद 53 आणि परिच्छेद 12 (ई) मध्ये असे निर्धारित करण्यात आले आहे की मागील तीन वर्षांतील अंदाज व प्रत्यक्ष यांच्यातील तफावतीच्या अनुषंगाने अर्थसंकल्पातील तरतुदीची तपासणी करून त्याआधारे प्रस्तावित रक्कम कमी करण्यात यावी. एकरकमी हा नियम म्हणून अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात प्रस्तावित करू नये. 2022-23 साठी एकरकमी अर्थसंकल्पीय तरतुदी **तक्ता 3.10** मध्ये दर्शविल्या आहेत.

**तक्ता 3.10: एकरकमी अर्थसंकल्पीय तरतुदी**

**(₹ कोटीत)**

| अ क्र | अनुदान क्रमांक व लेखा शीर्ष | तरतूद | खर्च | टिप्पणी |
|---|---|---|---|---|
| 1 | ओ 10-(4515-800-01-01)- अर्थसंकल्पात नसलेल्या भांडवली खर्चाकरिता एकरकमी तरतूद (राज्य योजना) | 3792.60 | 0.00 | संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली |
| 2 | जी02-(2070-800-02-01)- वेतन व भत्ते इ. करिता एकरकमी तरतूद | 1500.00 | 0.00 | |
| 3 | ओ04-(2515-800-01-01)- अर्थसंकल्पात नसलेल्या महसुली खर्चाकरिता एकरकमी तरतूद (राज्य योजना) | 100.00 | 0.00 | |
| 4 | टी05-(2225-796-01-51)- अर्थसंकल्पात नसलेल्या महसुली खर्चाकरिता एकरकमी तरतूद | 51.86 | 0.00 | |
| स्त्रोतः विनियोजन लेखे 2022-23 | | | | |

## 3.4.2 अर्थसंकल्पातील प्रमुख धोरणात्मक घोषणा आणि अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी त्यांचा प्रत्यक्ष निधी

वर्ष 2022-23 मध्ये शासनाने अनेक धोरणात्मक उपक्रम/योजना (₹ 10 कोटी व त्याहून अधिक) हाती घेतल्या त्या योजनांची मार्गदर्शक तत्त्वे/कार्यपद्धती मंजूर न होणे, प्रशासकीय मंजुरीअभावी कामे सुरू न होणे, अर्थसंकल्प मुक्त न करणे इत्यादि कारणांमुळे पूर्णपणे किंवा अंशतः कार्यान्वित होऊ शकल्या नव्हत्या. अशा योजनांमधील बचत इतर विभागांना निधीपासून वंचित ठेवते, ज्याचा ते वापर करू शकले असते.

16 योजनांअतर्गत असे निदर्शनास आले की ₹ 6,994 कोटींचा मंजूर खर्च (मूळ+पुरवणी), जो प्रत्यार्पण/पुनर्विनियोजनाद्वारे पूर्णपणे काढून घेण्यात आला जो **परिशिष्ट 3.8** मध्ये दर्शविला आहे. यावरून अर्थसंकल्पीय तरतूद अवास्तव प्रस्तावांवर आधारित होती हे सत्य प्रतिबिंबीत होते.

## 3.5 अर्थसंकल्पीय व लेखा प्रक्रियेच्या परिणामकारकतेबद्दल टिप्पण्या

## 3.5.1 अर्थसंकल्पातील प्रक्षेपण आणि प्रत्यक्ष व अपेक्षित यांच्यातील तफावत

अवास्तव प्रस्तावांवर आधारित अर्थसंकल्पीय तरतूद, खर्चावर संनियंत्रण ठेवणारे कमकुवत कार्यतंत्र आणि कमकुवत योजना अंमलबजावणी क्षमता/कमकुवत अंतर्गत नियंत्रणे हे विविध विकासात्मक गरजांकरिता अपुरे इष्टतम वाटप करण्यात होते. काही विभागांतील अतिरिक्त बचतीमुळे इतर विभागांना निधीपासून वंचित रहावे लागते, ज्याचा त्यांना उपयोग करता आला असता.

2022-23 मधील अर्थसंकल्पीय (मूळ/पुरवणी) तरतुदींच्या तुलनेत प्रत्यक्ष खर्चाची संक्षिप्त स्थिती **तक्ता 3.11** मध्ये दिली आहे.

**तक्ता 3.11: 2022-23 दरम्यान अर्थसंकल्पीय (मूळ/पुरवणी) तरतुदीच्या तुलनेत प्रत्यक्ष खर्चाची संक्षिप्त स्थिती**

(₹ कोटीत)


| | खर्चाचे स्वरूप | मूळ अनुदान/ विनियोजन | पुरवणी अनुदान/ विनियोजन | एकूण | प्रत्यक्ष खर्च | बचत | बचत % |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| दत्तमत | I महसुली | 386357.07 | 60562.14 | 446919.21 | 370399.40 | (-)76519.81 | 17.12 |
| | II भांडवली | 76383.22 | 19462.07 | 95845.29 | 68826.69 | (-)27018.60 | 28.19 |
| | III कर्जे आणि अग्रिमे | 2414.04 | 2543.35 | 4957.39 | 4664.41 | (-)292.98 | 5.91 |
| **एकूण दत्तमत** | | **465154.33** | **82567.56** | **547721.89** | **443890.50** | **(-)103831.39** | **18.96** |
| भारीत | IV महसुली | 49857.08 | 1964.30 | 51821.38 | 45136.96 | (-)6684.42 | 12.90 |
| | V भांडवली | 56.25 | 6.66 | 62.91 | 51.70 | (-)11.21 | 17.80 |
| | VI लोक ऋण | 53002.96 | 0.00 | 53002.96 | 44795.04 | (-)8207.92 | 15.49 |
| **एकूण भारीत** | | **102916.29** | **1970.96** | **104887.25** | **89983.70** | **(-)14903.55** | **14.21** |
| आकस्मिकता निधीसाठी विनियोजन | | 200.00 | ... | 200.00 | 200.00 | ... | |
| **एकूण** | | **568270.62** | **84538.52** | **652809.14** | **534074.20** | **(-)118734.94** | **18.19** |

स्त्रोत: विनियोजन लेखे 2022-23

महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I महाराष्ट्र, मुंबई यांचे कार्यालय अतिरिक्त व बचत यांची माहिती खर्चावरील मासिक अहवालाद्वारे नियंत्रण अधिकाऱ्यांना नियमितपणे देत होते. मार्च 2023 मध्ये प्राथमिक आणि अंतिम लेखे बंद झाल्यानंतर देखील त्यांनी संबंधित विभागांकडे ही बाब उचलून धरली होती आणि नियंत्रण अधिकाऱ्यांना लक्षणीय तफावतीच्या कारणांच्या स्पष्टीकरणाबद्दल विनंती केली होती, परंतु स्पष्टीकरण प्राप्त झाले नव्हते (जून 2023).

मागील पाच वर्षांतील अर्थसंकल्पीय वापराची स्थिती **आलेख 3.4** मध्ये दर्शविली आहे.

**आलेख 3.4: 2018-19 ते 2022-23 दरम्यान अर्थसंकल्पाचा उपयोग**




(स्त्रोत: संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे)

2018-19 ते 2022-23 या कालावधीतील मूळ अर्थसंकल्प, सुधारित अंदाज, प्रत्यक्ष खर्च यांचा कल **तक्ता.3.12** मध्ये

दर्शविण्यात आला आहे.

**तक्ता 3.12: मूळ अर्थसंकल्प, सुधारित अंदाज व प्रत्यक्ष खर्च**


(₹ कोटीत)

| | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 | 2022-23 |
|---|---|---|---|---|---|
| मूळ अर्थसंकल्प | 380734.44 | 431554.81 | 452136.69 | 503688.31 | 568270.62 |
| पुरवणी अर्थसंकल्प | 36056.94 | 65621.57 | 72152.87 | 60698.39 | 84538.52 |
| एकूण अर्थसंकल्प | 416791.38 | 497176.38 | 524289.56 | 564386.70 | 652809.14 |
| सुधारित अंदाज | 373234.54 | 416921.35 | 437390.51 | 496637.96 | 581268.25 |
| प्रत्यक्ष खर्च | 342935.03 | 391483.19 | 417048.36 | 452850.67 | 534074.20 |
| बचत | (-)73856.35 | (-)105693.19 | (-)107241.20 | (-)111536.03 | (-)118734.94 |
| मूळ तरतुदीच्या तुलनेत पुरवणी तरतुदीची *टक्केवारी* | 9.47 | 15.21 | 15.96 | 12.05 | 14.88 |
| एकूण तरतुदीच्या तुलनेत एकूण बचतीची/अतिरिक्तची *टक्केवारी* | 17.72 | 21.26 | 20.45 | 19.76 | 18.19 |
| एकूण अर्थसंकल्प - सुधारित अंदाज | 43556.84 | 80255.03 | 86899.05 | 67748.74 | 71540.89 |
| सुधारित अंदाज - प्रत्यक्ष खर्च | 30299.51 | 25438.16 | 20342.15 | 43787.29 | 47194.05 |
| एकूण अर्थसंकल्पाची *टक्केवारी* म्हणून (एकूण अर्थसंकल्प - सुधारित अंदाज) | 10.45 | 16.14 | 16.57 | 12.00 | 10.96 |
| एकूण अर्थसंकल्पाची *टक्केवारी* म्हणून (सुधारित अंदाज - प्रत्यक्ष खर्च) | 7.27 | 5.12 | 3.88 | 7.76 | 7.23 |
| स्त्रोत : संबंधित वर्षांची वार्षिक वित्तीय विवरणपत्रे व विनियोजन लेखे | | | | | |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की मागील वर्षीच्या (2021-22) 12.05 *टक्क्यांच्या* तुलनेत 2022-23 मधील ₹ 84,538.52 कोटींची पुरवणी तरतूद ही मूळ तरतुदीच्या 14.88 *टक्के* होती.

**आलेख 3.5: अर्थसंकल्पीय अंदाज, सुधारित अंदाज आणि प्रत्यक्ष दर्शविणारा कल**

(₹ कोटीत)




स्त्रोत : संबंधित वर्षांची वार्षिक वित्तीय विवरणपत्रे व विनियोजन लेखे

वरील आलेखावरून असे दिसून येते की, 2018-19 ते 2022-23 या वर्षांमध्ये सुधारित अंदाज हे राज्याच्या एकूण

अर्थसंकल्पापेक्षा कायम कमी होते. 2018-19 ते 2022-23 या कालावधीतील पुरवणी तरतुदी अनावश्यक ठरल्या कारण हा खर्च मूळ अर्थसंकल्पीय तरतुदींच्या स्तरापर्यंत देखील आला नाही.

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकेचा परिच्छेद 165 असे निर्धारित करते की ₹ 500 किंवा त्यापेक्षा अधिक रकमेच्या निधीच्या पुनर्विनियोजनास मंजुरी देणारे आदेश आणि काही विशिष्ट गोष्टींचा समावेश असलेली किंवा ठळक वैशिष्ट्य, त्यांच्यामुळे प्रभावित झालेल्या उप-शीर्षामधील भर आणि वजावटीच्या कारणांचा विशेष उल्लेख करावा. तथापि, प्रशासकीय विभागांनी जारी केलेल्या पुनर्विनियोजन आदेशांची छाननी केली असता असे निदर्शनास आले की, 2022-23 दरम्यान झालेल्या पुनर्विनियोजनाच्या 1063 बाबींपैकी 68 बाबींबाबत (6.40 *टक्के*) कोणतेही विशिष्ट कारण देण्यात आले नव्हते. हे महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमाच्या कलम 6 मध्ये परिकल्पित केलेल्या पारदर्शकतेच्या तत्त्वाच्या विरोधात आहे.

## 3.5.2 अर्थसंकल्पीय ओघ आणि अनुदानाचे पुनरावलोकन

### 3.5.2.1 खर्चाची घाई

सर्वसाधारण वित्तीय नियमांच्या नियम 62(3) मध्ये अशी तरतूद आहे की खर्चाची घाई विशेषतः आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात हे आर्थिक औचित्याचा भंग मानले जाते आणि ते टाळायला हवे.

मुंबई वित्तीय नियम, 1959 नुसार आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात खर्चाचा ओघ टाळावा. नियमातील तरतुदीच्या विपरीत 13 अनुदाने जे **तक्ता 3.13** मध्ये नमूद केले आहेत त्यात असे निदर्शनास आले की वर्षाच्या चौथ्या तिमाहीत 100 *टक्के* खर्च झाला.

चौथ्या तिमाहीत 100 *टक्के* खर्च झालेल्या 13 अनुदानांचा तपशील **तक्ता 3.13** मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता 3.13: मार्च 2023 मधील खर्चाचा ओघ**

(₹ कोटीत)

| अ क्र. | अनुदान क्रमांक | अनुदानाचा तपशील | वर्षभरातील एकूण खर्च | 2022-23 च्या चौथ्या तिमाहीतील खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | बी08 | पूर नियंत्रण प्रकल्प | 1.75 | 1.75 |
| 2 | सी09 | इतर प्रशासकीय व सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च | 7.66 | 7.66 |
| 3 | के09 | आर्थिक व सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च | 31.84 | 31.84 |
| 4 | के10 | उद्योगांवरील भांडवली खर्च | 72.52 | 72.52 |
| 5 | यू01 | व्याज प्रदाने | 6.62 | 6.62 |
| 6 | व्ही05 | आर्थिक सेवांवरील भांडवली खर्च | 2.91 | 2.91 |
| 7 | झेडए01 | सचिवालय व इतर सामाजिक सेवा | 599.17 | 599.17 |
| 8 | झेडडी05 | शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यांवरील भांडवली खर्च | 9.10 | 9.10 |
| 9 | झेडई02 | सामाजिक सुरक्षा व कल्याण यांवरील भांडवली खर्च | 25.50 | 25.50 |
| 10 | झेडई03 | शासकीय कर्मचारी, इत्यादींना कर्जे | 0.43 | 0.43 |
| 11 | झेडएफ04 | सार्वजनिक बांधकामांवरील भांडवली खर्च | 0.61 | 0.61 |
| 12 | झेडजी04 | अनुसूचित जातीच्या कल्याणावर भांडवली खर्च | 4.02 | 4.02 |
| 13 | झेडएच02 | सामाजिक सुरक्षा आणि कल्याण | 0.03 | 0.03 |


स्त्रोतः महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I महाराष्ट्र, मुंबई यांच्या कार्यालयातून प्राप्त झालेली माहिती

**परिशिष्ट 3.9** मध्ये दर्शविल्याप्रमाणे, चौथ्या तिमाहीत झालेला खर्च 50 ते 100 *टक्क्यां*दरम्यान होता आणि केवळ मार्च 2023 महिन्यात झालेला खर्च 50.18 ते 100 *टक्क्यांच्या* दरम्यान होता.

मार्च महिन्यातील खर्चाची *टक्केवारी* जास्त असलेल्या अनुदान एन-03 अंतर्गत मुख्य शीर्ष 2215 पाणीपुरवठा व स्वच्छता यांचा महिना-निहाय खर्च **तक्ता 3.6** मध्ये खाली दर्शविला आहे.

**आलेख 3.6: अनुदान एन-03 मुख्य शीर्ष 2215-
पाणी पुरवठा व स्वच्छता यांचा महिना-निहाय खर्च**

(₹ कोटीत)





(स्त्रोतः महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I महाराष्ट्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती)

असे निदर्शनास आले की मुख्य शीर्ष 2215 अंतर्गत अनुदान एन-03 अंतर्गत ₹ 739.47 कोटींच्या एकूण खर्चापैकी 98.96 *टक्के* (₹ 731.82 कोटी) खर्च मार्च 2023 मध्ये झाला.

## जमा व खर्चाचा ओघ

2022-23 मध्ये राज्याच्या तिजोरीत जमेचा मासिक ओघ आणि संवितरण **आलेख 3.7** मध्ये दर्शविले आहे.

**आलेख 3.7: 2022-23 दरम्यान मासिक जमा व खर्च**




| | एप्रिल-2022 | मे-2022 | जून-2022 | जुलै-2022 | ऑगस्ट-2022 | सप्टेंबर-2022 | ऑक्टोबर-2022 | नोव्हेंबर-2022 | डिसेंबर-2022 | जानेवारी-2023 | फेब्रुवारी-2023 | मार्च-2023 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जमा | 28325 | 44990 | 56492 | 28479 | 30810 | 35344 | 46317 | 40382 | 34912 | 33016 | 37718 | 84437 |
| खर्च | 29138 | 28913 | 40984 | 29019 | 39663 | 40106 | 42452 | 23673 | 43010 | 32395 | 42917 | 141805 |

(स्त्रोतः मासिक नागरी लेखे)

**आलेख 3.7** वरून असे दिसून येते की मे, जून, ऑक्टोबर, नोव्हेंबर व जानेवारी या महिन्यात खर्चाच्या तुलनेत जमा अधिक होत्या. तथापि, वर्षाच्या उर्वरित महिन्यांच्या तुलनेत मार्च 2023 मध्ये जमा आणि खर्च या दोन्हींमध्ये लक्षणीय वाढ झाली. तसेच, 2022-23 मधील खर्चाच्या स्वरूपाची छाननी केली असता असे उघड झाले की, राज्य शासनाने केवळ मार्च 2023 मध्ये ₹ 1,41,805 कोटींचा केलेला खर्च हा एकूण खर्च ₹ 5,34,074 कोटींच्या 26.55 *टक्के* होता.

आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात होणारा प्रचंड खर्च विवेकी आर्थिक व्यवस्थापनाशी विसंगत आहे आणि कमकुवत अंतर्गत नियंत्रण प्रणाली आणि अर्थसंकल्पीय नियंत्रण/व्यवस्थापनाचा अभाव दर्शवितो.

## 3.5.3 निवडक अनुदानांचे पुनर्विलोकन

दोन निवडक अनुदानांच्या संदर्भात म्हणजेच अनुदान एच-6 सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारती यावरील खर्च आणि अनुदान क्यू-3 गृहनिर्माण यांची अर्थसंकल्पीय कार्यपद्धती व खर्चावरील नियंत्रणाचे पुनर्विलोकन करण्यात आले ज्यामध्ये मूळ अनुदान, पुरवणी मागण्या आणि प्रत्यक्ष खर्च यामधील तफावतीच्या परिमाणाचे विश्लेषण करण्यात आले.

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिकेत अशी तरतूद आहे की अनुदान प्रशासित करणाऱ्या प्राधिकाऱ्यांवर त्यांच्या नियंत्रणाखालील खर्चाच्या प्रगतीवर निरीक्षण ठेवण्याची तसेच खर्च मंजूर अनुदान किंवा विनियोजनांतर्गत राखण्याची जबाबदारी असते. अंदाजपत्रक वेळेवर आणि अचूकपणे तयार करणे तसेच त्यांच्या ताब्यात असलेले अनुदान त्याच बाबींवर खर्च केले ज्यासाठी त्यांची तरतूद केली होती हे सुनिश्चित करणे आणि आवश्यकता नसल्यास बचत प्रत्यार्पित करणे ह्या बाबी प्राधिकाऱ्यांची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यांमध्ये अंतर्भूत असतात.

प्राधिकारी ह्या सूचनांचे कितपत पालन करीत आहेत हे तपासण्याच्या दृष्टीने लेखापरीक्षेने 2019-20 ते 2022-23 ह्या कालावधीसाठी प्रशासकीय विभागाच्या खालील अनुदानांच्या अभिलेख्यांची चाचणी- तपासणी केली.

### 3.5.3.1 अनुदान एच-6 सार्वजनिक बांधकामे आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारतीवरील खर्च

#### (i) प्रस्तावना

या अनुदानाअंतर्गत सार्वजनिक बांधकाम आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारत, सामान्य शिक्षण, तंत्रशिक्षण, कला व संस्कृती, वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य, नगरविकास, कामगार व रोजगार, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय यासाठी महसुली खर्चाची तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये (2059) सार्वजनिक बांधकाम, (2202) सामान्य शिक्षण, (2203) तंत्रशिक्षण, (2205) कला व संस्कृती, (2210) वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य, (2217) नगरविकास, (2230) कामगार व रोजगार, (2403) पशुसंवर्धन व (2405) मत्स्यव्यवसाय ह्या नऊ मुख्य शीर्षांचा समावेश आहे.

#### (ii) अर्थसंकल्प आणि खर्च

वर्ष 2020-21 ते 2022-23 या वर्षांसाठी अनुदानाअंतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदी, प्रत्यक्ष संवितरण आणि बचतीची एकूण स्थिती **तक्ता 3.14** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 3.14: अनुदान क्रमांक एच-06 अंतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदी व प्रत्यक्ष खर्चाचा तपशील**

(₹ कोटीत)

| वर्ष | मूळ तरतूद | पुरवणी तरतूद | एकूण अनुदान/ विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | बचत | बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| **एच-06 सार्वजनिक बांधकाम आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारतीवरील खर्च** | | | | | | |
| 2020-21 | 3059.20 | 100.00 | 3159.20 | 2052.84 | 1106.37 | 35.02 |
| 2021-22 | 3190.92 | 263.18 | 3454.10 | 2587.23 | 866.86 | 25.09 |
| 2022-23 | 3353.58 | 351.61 | 3705.20 | 3031.42 | 673.78 | 18.18 |
| स्त्रोत : संबंधित वर्षाचे विनियोजन लेखे | | | | | | |

**तक्ता 3.14** असे दर्शवितो की 2020-21 ते 2022-23 या कालावधीत बचतीची *टक्केवारी* 18.18 *टक्के* ते 35.02 *टक्के* दरम्यान होती.

## (iii) उपशीर्षांतर्गत अनुदानाच्या खर्चाची घाई

मुंबई वित्तीय नियम, 1959 अनुसार आर्थिक वर्षाच्या शेवटच्या महिन्यात खर्चाची घाई करणे टाळावयास हवे. खर्चाचा एकसमान प्रवाह ही योग्य अर्थसंकल्पीय नियंत्रणाची प्राथमिक गरज आहे. अनुदान एच 06 अंतर्गत एका उपशीर्षामध्ये 2022-23 च्या शेवटच्या तिमाहीत खर्चाच्या 41 *टक्के* ₹ 770.53 कोटी इतका खर्च झाला आणि मार्च 2023 मध्ये दोन उपशीर्षामध्ये खर्चाच्या 25 *टक्क्यांहून* अधिक ₹ 517.98 कोटी इतका खर्च झाला जे **तक्ता 3.15** मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता 3.15: अनुदान एच06 अंतर्गत 2022-23 च्या शेवटच्या महिन्यात खर्चाची घाई**

(₹ कोटीत)

| अक्र | उपशीर्ष | तपशील | एकूण खर्च | 2022-23 च्या चौथ्या तिमाहीतील खर्च | 2022-23 च्या चौथ्या तिमाहीतील एकूण खर्चाची टक्केवारी | मार्च 2023 मधील खर्च | मार्च 2023 मधील खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2059 | सार्वजनिक बांधकाम आणि प्रशासकीय व कार्यचालन इमारती | 1859.39 | 770.53 | 41.44 | 504.60 | 27.14 |
| 2 | 2217 | | 41.09 | 0.00 | 0.00 | 13.38 | 32.57 |

स्रोत: विनियोजन लेखे 2022-23

महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियमपुस्तिकेच्या परिच्छेद 173 नुसार, खर्च करणाऱ्या विभागांना जसे आणि जेव्हा बचत अपेक्षित असेल तेव्हा अनुदान/विनियोजन किंवा त्यातील काही भाग वित्त विभागाला प्रत्यार्पित करणे आवश्यक आहे. तसेच, आर्थिक वर्ष संपण्याची वाट न पाहता हा अंदाज येताच निधी प्रत्यार्पित करावा, जेणेकरून वित्त विभागाला अपेक्षित बचत इतर गरजू योजनांवर कार्यक्षमतेने पुन्हा वापरता येईल.

## (iv) संपूर्ण तरतुदीचे प्रत्यार्पण

वर्ष 2022-23 च्या विनियोजन लेख्यांची छाननी केली असता असे निदर्शनास आले की, अनुदान एच-06 अंतर्गत दोन उपशीर्षांखालील ₹ 3.95 कोटींची संपूर्ण तरतूद पुनर्विनियोजनाद्वारे मार्च 2023 मध्ये प्रत्यार्पित करण्यात आली जे **तक्ता 3.16** मध्ये तपशीलवार दर्शविले आहे.

**तक्ता 3.16: अनुदान क्र. एच-06 अंतर्गत संपूर्ण तरतुदीचे प्रत्यार्पण दर्शविणारे तपशील**

(₹ कोटीत)

| अक्र | तपशील | मूळ व पुरवणी अनुदान | पुनर्विनियोजित रक्कम | एकूण अनुदान | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|---|
| **एच-06-सार्वजनिक बांधकाम प्रशासकीय व कार्यचालन इमारत** | | | | | |
| 1 | 2059-सार्वजनिक बांधकाम 001(49)(01) अधीक्षक अभियंता दक्षता पथक मुंबई-पर्यवेक्षण | 1.45 | 1.45 | 0.00 | 0.00 |
| 2 | 2059-सार्वजनिक बांधकाम 052(00) (02) सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत कार्यालयाचे संगणकीकरण | 2.50 | 2.50 | 0.00 | 0.00 |

स्रोत: विनियोजन लेखे 2022-23

मार्च 2023 महिन्यातील ₹ 3.95 कोटींच्या संपूर्ण तरतुदीचे प्रत्यार्पण कोणतेही कारण न देता करण्यात आले.

### 3.5.3.2 अनुदान क्यू-03 - गृहनिर्माण

#### (i) प्रस्तावना

**अनुदान क्यू -03 - गृहनिर्माण:** मुख्य शीर्ष 2216-गृहनिर्माण याचा समावेश आहे. या अनुदानाअंतर्गत गृहनिर्माण मंडळे व महामंडळांना सहाय्याची तरतूद केली आहे.

#### (ii) अर्थसंकल्प आणि खर्च

वर्ष 2020-21 ते 2022-23 या वर्षांसाठी अनुदानांतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदी, प्रत्यक्ष संवितरण आणि बचतीची एकूण स्थिती **तक्ता 3.17** मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता 3.17: अनुदान क्यू 03 अंतर्गत अर्थसंकल्पीय तरतुदी व प्रत्यक्ष खर्चाचा तपशील**

(₹ कोटीत)

| वर्ष | मूळ तरतूद | पुरवणी तरतूद | एकूण अनुदान/ विनियोजन | प्रत्यक्ष खर्च | बचत | बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| **अनुदान क्यू-03 गृहनिर्माण** | | | | | | |
| 2020-21 | 4473.17 | 0.55 | 4473.72 | 736.14 | 3737.58 | 83.55 |
| 2021-22 | 4535.16 | 0.67 | 4535.83 | 365.30 | 4170.53 | 91.95 |
| 2022-23 | 9283.10 | 0.00 | 9283.10 | 1699.09 | 7584.02 | 81.70 |
| स्त्रोत: संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे | | | | | | |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, 2020-21 ते 2022-23 या कालावधीत अनुदान क्रमांक क्यू-03 मध्ये 81.70 *टक्के* ते 91.95 *टक्के* या दरम्यान सातत्याने बचत झाली. अनुदान क्यू-03 अंतर्गत केंद्र शासनाकडून मर्यादित निधी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण कडून अल्प मागणी आणि सुधारित अर्थसंकल्पात वित्त विभागाद्वारे तरतूदीमध्ये कपात करणे ही प्रत्यार्पणाची मुख्य कारणे होती.

#### (iii) उपशीर्षांतर्गत लक्षणीय बचत

वर्ष 2022-23 मध्ये अनुदान क्र. क्यू-03 अंतर्गत सहा उपशीर्षांमध्ये ₹ 10 कोटी किंवा त्यापेक्षा अधिक बचत दिसून आली, जी एकूण तरतुदीच्या 30 *टक्के* ते 88.67 *टक्क्यांच्या* दरम्यान होती जी **तक्ता 3.18** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 3.18 : अनुदान क्यू-03 अंतर्गत उपशीर्षनिहाय लक्षणीय बचत**

(₹ कोटीत)

| अक्र | संगणक सांकेतांक | तपशील | एकूण अनुदान | प्रत्यक्ष | बचत | बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| **क्यू-03 - गृहनिर्माण (दत्तमत)** | | | | | | |
| 1 | 2216-103(03) (06) | चंद्रपूरच्या नव्या वसाहतीचा विकास | 65.00 | 31.85 | 33.15 | 51.00 |
| मार्च 2023 मध्ये प्रत्यार्पित केलेली ₹ 33.15 कोटींची तरतूद या योजनेअंतर्गत झालेल्या प्रत्यक्ष खर्चावर आधारित होती. | | | | | | |
| 2 | 2216-103(08) (01) | सर्वांसाठी गृहनिर्माण- अंमलबजावणी अभिकरणांना अनुदाने (प्रधानमंत्री आवास योजना) (केंद्राचा हिस्सा 60 *टक्के*) | 8105.00 | 917.91 | 7187.09 | 88.67 |
| मार्च 2023 मध्ये ₹ 7,187.09 कोटींची तरतूद प्रत्यार्पित करण्याचा संबंध केंद्र सरकारद्वारे निर्बंधित केंद्रीय हिस्सा मुक्त करण्याशी लावला | | | | | | |

| अक्र | संगणक सांकेतांक | तपशील | एकूण अनुदान | प्रत्यक्ष | बचत | बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 2216-103(08)(02) | सर्वांसाठी गृहनिर्माण- अंमलबजावणी अभिकरणांना अनुदाने (प्रधानमंत्री आवास योजना) (राज्याचा हिस्सा 40 *टक्के*) | 905.50 | 611.28 | 294.22 | 32.49 |
| मार्च 2023 मध्ये ₹ 294.22 कोटींची तरतूद प्रत्यार्पित करण्याचा संबंध वित्त विभागाद्वारे राज्याचा हिस्सा मुक्त करण्याशी लावला. | | | | | | |
| 4 | 2216-103 (01)(04) | गृहनिर्माण योजना (पायाभूत सुविधा) | 100.00 | 60.00 | 40.00 | 40.00 |
| मार्च 2023 मध्ये ₹ 40.00 कोटींची तरतूद प्रत्यार्पित करण्याचा संबंध महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाद्वारे कमी मागणीशी लावला. | | | | | | |
| 5 | 2216-800 (00)(02) | मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधीत जमा करण्याकरिता शासकीय अंशदान म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला प्रदाने | 38.00 | 26.60 | 11.40 | 30.00 |
| मार्च 2023 मध्ये ₹ 11.40 कोटींची तरतूद प्रत्यार्पित करण्याचा संबंध सुधारित अंदाजपत्रकात वित्त विभागाने तरतूद कमी केल्याशी लावला. | | | | | | |
| 6 | 2216-800 (00)(05) | मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधीला जमा करण्याकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला उपकर वसुलीची प्रदाने | 38.00 | 26.60 | 11.40 | 30.00 |
| मार्च 2023 मध्ये ₹ 11.40 कोटींची तरतूद प्रत्यार्पित करण्याचा संबंध सुधारित अंदाजपत्रकात वित्त विभागाने तरतूद कमी केल्याशी लावला | | | | | | |
| स्त्रोत: विनियोजन लेखे 2022-23 | | | | | | |

### (iv) उपशीर्षाअंतर्गत सातत्याने बचत

### (ए) चंद्रपूरच्या नवीन वसाहतीचा विकास

गृहनिर्माण विभाग महाराष्ट्र शासन यांनी चंद्रपूर जिल्ह्यात 1391.71 हेक्टर क्षेत्रावर चंद्रपूर वसाहत वसविण्याचा निर्णय (1998) घेतला. चंद्रपूर-बेल्लारपूर क्षेत्राच्या मंजूर प्रादेशिक आराखड्यात प्रस्तावित केल्याप्रमाणे नवीन चंद्रपूरच्या अधिसूचित क्षेत्रात विकासकामे करण्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आली होती. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचे प्रादेशिक घटक असलेल्या नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळामार्फत विकास कामांची योजना राबविण्यात येत होती. नगरविकास विभागाने 30 जून 1998 च्या अधिसूचनेद्वारे सदर योजनेचा विकास आराखडा मंजूर केला. या योजनेत नवीन चंद्रपूर शहरातील वीजपुरवठा, पाणीपुरवठा, मुख्य रस्त्यांची कामे, भूसंपादनाची कामे, पूल उभारणी आदी कामांचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासनाने 7 एप्रिल 2008 च्या शासन निर्णयाद्वारे ठरवले की नवीन चंद्रपूर शहराच्या विकासकामांसाठी लागणारा निधी प्रथम महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने खर्च करावा व त्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी आवश्यक प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करावा. वर्ष 2019-20 ते 2022-23 या कालावधीत अर्थसंकल्पातील तरतूद व झालेला खर्च **तक्ता 3.19** मध्ये तपशीलवार दिला आहे.

**तक्ता 3.19 : 2019-20 ते 2022-23 या कालावधीतील अर्थसंकल्पीय तरतूद आणि खर्च**

(₹ कोटीत)

| वर्ष | तपशील | अर्थसंकल्पीय तरतूद | प्रत्यक्ष खर्च | बचत | बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 2019-20 | 2216 गृहनिर्माण<br>103 गृहनिर्माण मंडळ, महामंडळ इत्यादींना सहाय्य<br>103(03)(6) चंद्रपूरच्या नवीन वसाहतीचा विकास | 50.00 | 30.00 | 20.00 | 40 |
| 2020-21 | | 70.00 | 0.00 | 70.00 | 100 |
| 2021-22 | | 80.00 | 0.00 | 80.00 | 100 |
| 2022-23 | | 65.00 | 31.85 | 33.15 | 51 |
| **एकूण** | | **265.00** | **61.85** | **203.15** | |
| स्त्रोत: संबंधित वर्षांचे विनियोजन लेखे | | | | | |

वर्ष 2020-21 दरम्यान नियोजन विभागाने प्रस्तावाला मंजुरी न दिल्याने आणि 2021-22 मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने सादर केलेल्या योजनेअंतर्गत झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रस्तावांमध्ये राज्य शासनाने घेतलेल्या हरकतींची विहित मुदतीत सुधारणा न केल्याने संपूर्ण अर्थसंकल्पीय तरतूद प्रत्यार्पित/पुनर्विनियोजित करण्यात आली.

या योजनेसाठी सातत्याने अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. तथापि, वर्ष 2020-21 व 2021-22 साठी संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली असून 2022-23 या वर्षासाठी ₹65.00 कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी केवळ ₹31.85 कोटी खर्च करण्यात आले. यावरून खर्चावरील सुमार संनियंत्रण आणि कमकुवत आर्थिक नियंत्रणे दिसून आली.

2019-20 ते 2022-23 या कालावधीसाठी एकूण अर्थसंकल्पीय तरतूद ₹ 265.00 कोटी होती, त्यापैकी केवळ ₹ 61.85 कोटी खर्च करण्यात आले आणि ₹ 203.15 कोटींची (76 *टक्के*) शिल्लक तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली. हे प्रकरण सचिव, गृहनिर्माण यांच्याकडे पाठविण्यात (ऑगस्ट 2023) आले. उत्तर प्रतिक्षेत आहे.

## (बी) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)

भारत सरकारने जून 2015 मध्ये वर्ष 2022 पर्यंत सर्वांसाठी घरे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना सुरू केली. या योजनेची मुदत 31 डिसेंबर 2024 पर्यंत वाढविण्यात आली. सध्या राज्यातील 397 शहरांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या निधीचे स्वरूप केंद्राचा हिस्सा 60 *टक्के* आणि राज्याचा हिस्सा 40 *टक्के* असे आहे. सदर योजनेसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण आणि नगरपालिका प्रशासन संचालनालय यांना अनुक्रमे संचालन अभिकरण आणि अभियान संचालनालय म्हणून अधिकृत करण्यात आले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेची मार्गदर्शक तत्त्वे आणि वेळोवेळी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, योजनेच्या लाभार्थ्यांना ₹ 1.5 लाख केंद्राचे सहाय्य आणि ₹ 1.00 लाख राज्याचा हिस्सा प्रति घर उपलब्ध करून दिला जाईल. गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी अतिरिक्त अर्थसंकल्पीय स्त्रोत असलेल्या महाराष्ट्र निवारा निधीतून ₹ 1.00 लाख (प्रतिघर प्रति लाभार्थी) राज्याचा हिस्सा देण्यास मान्यता (फेब्रुवारी 2018) दिली.

2019-20 ते 2022-23 या कालावधीतील योजनेची अर्थसंकल्पीय तरतूद, प्रत्यक्ष खर्च आणि बचत **तक्ता 3.20** मध्ये तपशीलवार दिले आहे.

**तक्ता 3.20 : 2019-20 ते 2022-23 या कालावधीतील अर्थसंकल्पीय तरतूद आणि प्रत्यक्ष खर्च**

**(₹ कोटीत)**

| वर्ष | घोषित योजना | अर्थसंकल्पीय तरतूद | प्रत्यक्ष खर्च | बचत | बचतीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 2019-20 | सर्वांसाठी गृहनिर्माण- अंमलबजावणी अभिकरणांना अनुदाने (प्रधानमंत्री आवास योजना) (केंद्राचा हिस्सा 60%) | 6189.42 | 0.00 | 6189.42 | 100.00 |
| 2019-20 | सर्वांसाठी गृहनिर्माण- अंमलबजावणी अभिकरणांना अनुदाने (प्रधानमंत्री आवास योजना) (राज्याचा हिस्सा 40%) | 705.59 | 0.00 | 705.59 | 100.00 |
| 2020-21 | सर्वांसाठी गृहनिर्माण- अंमलबजावणी अभिकरणांना अनुदाने (प्रधानमंत्री आवास योजना) (केंद्राचा हिस्सा 60%) | 3500.00 | 663.45 | 2836.55 | 81.04 |
| 2020-21 | सर्वांसाठी गृहनिर्माण- अंमलबजावणी अभिकरणांना अनुदाने (प्रधानमंत्री आवास योजना) (राज्याचा हिस्सा 40%) | 699.50 | 0.00 | 699.50 | 100.00 |
| 2021-22 | सर्वांसाठी गृहनिर्माण- अंमलबजावणी अभिकरणांना अनुदाने (प्रधानमंत्री आवास योजना) (केंद्राचा हिस्सा 60%) | 3500.00 | 256.95 | 3243.05 | 92.66 |
| 2021-22 | सर्वांसाठी गृहनिर्माण- अंमलबजावणी अभिकरणांना अनुदाने (प्रधानमंत्री आवास योजना) (राज्याचा हिस्सा 40%) | 750.49 | 0.00 | 750.49 | 100.00 |
| 2022-23 | सर्वांसाठी गृहनिर्माण- अंमलबजावणी अभिकरणांना अनुदाने (प्रधानमंत्री आवास योजना) (केंद्राचा हिस्सा 60%) | 8105.00 | 917.91 | 7187.09 | 88.67 |
| 2022-23 | सर्वांसाठी गृहनिर्माण- अंमलबजावणी अभिकरणांना अनुदाने (प्रधानमंत्री आवास योजना) (राज्याचा हिस्सा 40%) | 905.50 | 611.28 | 294.22 | 32.49 |
| स्त्रोत: विनियोजन लेखे 2022-23 | | | | | |

या योजनेअंतर्गत केंद्राचा हिस्सा मुक्त न झाल्याने 2019-20 दरम्यान राज्याच्या हिश्श्याची संपूर्ण रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली. 2020-21 दरम्यान विभागाने ₹ 699.50 कोटींची संपूर्ण तरतूद केंद्राचा हिस्सा मुक्त न झाल्याचे कारण देत प्रत्यार्पित केली होती. तथापि, केंद्र सरकारने 2020-21 मध्ये ₹ 633.45 कोटींचे अनुदान मुक्त केल्याचे दिसून आले. म्हणून, राज्याच्या हिश्श्याची संपूर्ण तरतूद प्रत्यार्पित करण्याचे विभागाने दिलेले कारण विरोधाभासी आहे. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार (फेब्रुवारी 2018) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अखत्यारीत असलेल्या 'महाराष्ट्र निवारा निधी' या अतिरिक्त अर्थसंकल्पीय संसाधनातून 2021-22 दरम्यान या योजनेचा खर्च करण्यात आला. 'महाराष्ट्र निवारा निधी' चा निधी आणि कार्यप्रणाली, या अहवालाच्या परिच्छेद 2.5.2.7.1 मध्ये स्पष्ट केले आहे. त्यामुळे अवास्तव प्रस्तावांवर आधारित अर्थसंकल्पातील तरतुदीमुळे अत्याधिक बचत होते आणि इतर विभाग निधीपासून वंचित राहतात.

## 3.6 निष्कर्ष

- एकूण तरतुदीपैकी 18.19 *टक्के* निधी वापराविना राहिल्याने राज्य शासनाने राबविलेली अर्थसंकल्पीय प्रक्रिया अधिक वास्तववादी असणे गरजेचे आहे. वर्षभरात झालेला एकूण खर्च मूळ अर्थसंकल्पापेक्षा सहा *टक्के* कमी होता आणि पुरवणी अर्थसंकल्प मूळ अंदाजपत्रकाच्या 15 *टक्के* होता.
- महसूल व भांडवली विभागात चुकीचे वर्गीकरण झाल्याची प्रकरणे समोर आली.
- भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 नुसार नियमित करणे आवश्यक असलेल्या ₹ 71.66 कोटींच्या सहा दत्तमत अनुदानांमध्ये अतिरिक्त खर्च आणि दोन भारीत विनियोजनांमध्ये अतिरिक्त खर्च झाला. तसेच, वर्ष 2017-18 ते 2021-22 या वर्षासाठी 42 अनुदाने व 15 विनियोजनांचा ₹ 2,918.52 कोटींचा अतिरिक्त खर्च मार्च 2023 पर्यंत नियमितीकरणासाठी प्रलंबित होता.
- पुरवणी अनुदाने/विनियोजने तसेच पुनर्विनियोजन पुरेशा कारणाशिवाय प्राप्त करण्यात आली कारण मोठ्या रकमेचा वापर झाला नाही.

## 3.7 शिफारशी

(i) राज्य शासनाने विभागांच्या गरजा आणि वाटप केलेल्या संसाधनांचा वापर करण्याची त्यांची क्षमता लक्षात घेऊन विश्वासार्ह गृहितकांवर आधारित वास्तववादी अर्थसंकल्प तयार करावे.

(ii) बचतीला आळा घालणे, अनुदान/विनियोजनातील मोठ्या बचती आटोक्यात ठेवणे आणि अपेक्षित बचत निश्चित मुदतीत/वेळीच ओळखून ती प्रत्यार्पित करणे सुनिश्चित करण्यासाठी अर्थसंकल्पाची योग्य अंमलबजावणी आणि संनियंत्रण करण्यासाठी शासनाने एक योग्य नियंत्रण यंत्रणा स्थापन करणे आवश्यक आहे.

(iii) अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा अतिरिक्त खर्चाच्या प्रलंबित नियमितीकरणाच्या सर्व प्रकरणांना प्राधान्य देण्यात यावे.